# प्रकरण - ६ : नामविचार

## नाम म्हणजे काय ?

नाम :-

प्रत्यक्षात असणाऱ्या आणि कल्पनेने जाणलेल्या वस्तूंना किंवा त्यांच्या गुणधर्मांना दिलेली जी नावे आहेत त्यांना नाम असे म्हणतात.

"सृष्टीतील कोणत्याही घटकाला ओळखण्यासाठी वापरण्यात येणारा शब्द म्हणजे नाम होय."

उदा.,

शाळा, पुस्तक, मुलगी, तारा, लेखनी, उंदीर, मांजर, खेळ, खेळाडू, मंदीर, आंबा, चेंडू, सौंदर्य इत्यादी.

नामाचे प्रकार

### नामाचे प्रकार

- ~~सामान्यनाम~~
- सामान्यनाम
  1. पदार्थवाचक नाम
  2. समुहवाचक नाम
- विशेषनाम
- भाववाचक नाम

### नामाचे वर्गीकरण

- सिद्ध नामे
  1. सामान्यनाम
  2. विशेषनाम
  3. भाववाचक नाम
- साधित नामे
  1. विशेषण नामे
  2. धातूवाचक नामे
  3. अव्ययवाचक नामे

# नाम

- धर्मिवाचक नाम
  1. सामान्यनाम
  2. विशेषनाम
- धर्मवाचक नाम
  1. भाववाचक नाम

## 1. सामान्यनाम :-

एकाच गटातील प्रत्येक वस्तूला समान गुणधर्मामुळे जे एकच नाव दिले जाते त्याला सामान्यनाम असे म्हणतात.

उदा.,

मुलगी, खेळाडू, पुस्तक, शाळा, पर्वत, नदी इत्यादी.

### सामान्यनामाचे प्रकार :-

1. पदार्थवाचक नाम :-

जे घटक शक्यतो लीटर, मीटर किंवा किलोग्रॅम मध्ये मोजले जातात (संख्येत मोजले जात नाहीत) त्यांना पदार्थवाचक नाम म्हणतात.

उदा., :- तांबे, सोने, कापड, पिठ, पाणी, पेट्रोल, रॉकेल, साखर मीठ, हवा, प्लॅस्टिक इत्यादी.

2. समुहवाचक नाम :-

समान गुणधर्म असणाऱ्या अनेक घटकांच्या एकत्रित समुहाला दिलेल्या नावाला समुहवाचक नाम असे म्हणतात.

## 2. विशेषनाम :-

एखाद्या नामातून एका विशिष्ट व्यक्तींचा, प्राण्यांचा अथवा वस्तूंचा बोध होत असेल तर अशा नामास विशेषनाम असे म्हणतात.
उदा., घातू, ब्रिटन, यमुना इत्यादी.

| सामान्य नाम | विशेष नाम |
|---|---|
| १. नदी | गंगा, सिंधू, गोदावरी |
| २. पर्वत | सह्याद्री, हिमालय, अरवली |
| ३. शहर | कोल्हापूर, लातूर, सोलापूर |
| ४. मुलगा | नितेश, रितेश, निलेश, शैलेश |
| ५. मुलगी | प्रियंका, ऋतुजा, कोमल, सुनिता |

## ३). भाववाचक नाम :-

ज्या नामाने प्राणी किंवा वस्तू यांमध्ये असलेला गुणधर्म किंवा भाव यांचा बोध होतो त्याला भाववाचक नाम असे म्हणतात.
उदा., विश्रांती, शौर्य, आनंद, दुःख, वात्सल्य इत्यादी.

### भाववाचकनामे साधण्याचे प्रकार :-

सामान्य नामे
विशेष नामे
विशेषणे

यांना आई, ई, की, गिरी, ता, त्व, पण-पणा, य, वा, वी हे प्रत्यय लावुन भाववाचक नामे बनतात.

उदा.,

| शब्द | प्रत्यय | भाववाचक नाम | इतर उदाहरणे |
|---|---|---|---|
| नवल | आई | नवलाई | खोदाई, धुलाई, चढाई |
| श्रीमंत | ई | श्रीमंती | गरिबी, गोडी, आवडी |
| पाटील | की | पाटीलकी | आपुलकी, गावकी, भिक्षुकी |
| गुलाम | गिरी | गुलामगिरी | भाईगिरी, दादागिरी, कामगिरी |
| शांत | ता | शांतता | समता, नम्रता, समानता |
| मनुष्य | त्व | मनुष्यत्व | नेतृत्व, शत्रुत्व, पौढत्व |
| शहाणा | पण-पणा | शहाणपणा, शहाणपण | प्रामाणिकपणा, देवपणा |
| सुंदर | य | सौंदर्य | शौर्य, धैर्य, माधुर्य |
| गोड | वा | गोडवा | पाडवा, गारवा |
| थोर | वी | थोरवी | गोडवी, पालवी |

★ भाववाचक नामाचे तीन गट :-

1). स्थितीदर्शक :- स्वातंत्र्य, दारिद्र्य, तारुण्य, वार्धक्य

2). गुणदर्शक :- प्रामाणिकपणा, धैर्य, नम्रता

3). कृतिदर्शक :- उड्डाण, हास्य, चळवळ, नृत्य, भाव, चोरी.

टीप-1: सामान्यनामाचे अनेकवचन होऊ शकते तर विशेषनाम व भाववाचक नाम हे एकवचनी असतात.

टीप-2: सामान्य नाम हे जातीवाचक असते तर, विशेषनाम हे व्यक्तीवाचक असते.

टीप-3: सामान्य नामे व विशेष नामे यांना धर्मीवाचक नामे म्हणतात तर भाववाचक नामाला धर्म वाचक नाम म्हणतात.

Page No. :
Date : / /

★ नामाचे विविध उपयोग :-

1). सामान्य नामाचा विशेषनाम म्हणून उपयोग -

एखाद्या सामान्य नामाचा एखादी विशिष्ट व्यक्ती स्थळ, वस्तू, तसेच प्राणी यासाठी उपयोग केल्यास ते विशेषनाम होते.

उदा., 1). आताच तो नगरहून आला.
2). आमचा पोपट गावाला गेला.

वरील पहिल्या उदाहरणात नगर म्हणजे कोणतेही शहर परंतु या ठिकाणी विशिष्ट स्थळासाठी उपयोग केल्याने विशेष नामाचा उपयोग होतो.

उदा., बेबी, चिन्हाबाई, तारा.

2). विशेष नामाचा सामान्यनाम म्हणून उपयोग :-

एखाद्या विशेषनामाचा उपयोग दुसऱ्याला उपमा देण्यासाठी किंवा अनेकवचन म्हणून केल्यास ते सामान्य नाम म्हणून होतो.

उदा., 1). तुमचा मुलगा कुंभकर्णाच दिसतो.
2). आईने सोळा सोमवारचे व्रत केले.

इतर उदाहरणे :- नारळ, सुदाम, भिम, जमदग्नी, लक्ष्मी, पाटील, थांब, कैकई इत्यादी.

3). भाववाचक नामाचे विशेषनाम :-

भाववाचक नामाचा उपयोग व्यक्तीसाठी केल्यास ते विशेषण होते.

उदा., 1). शांती ही माझ्या बहिणीची मुलगी.
2). विश्वास परिक्षेत पहिला आला.

Page No. :
Date : / /

४). विशेषण साधित नामे :-

विशेषणांना प्रत्यय लावून त्यांचा नामासारखा उपयोग केल्यास ते विशेषण साधित नाम होते.

उदा., १). नकट्या मुलीच्या लग्नाला सतराशे विघ्ने (विशेषण)
२). नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न (विशेषणसाधित नाम)

इतर उदाहरणे :- सुंदरांना, श्रीमंताना, शहाण्याला, आंधळ्याला इत्यादी.

५). धातूसाधित नामे :-

धातूला प्रत्यय जोडून त्याचा नामासारखा उपयोग केल्यास त्याला धातूसाधित नामे म्हणतात.

उदा., गुरुजींचे वागणे मोठे प्रेमळ आहे. (धातूसाधित नाम)
वाग- धातूसाधित नाम.

इतर उदाहरणे :- देणाऱ्याने, घेणाऱ्याने, कर, दर, हसू, रडू.

६). अव्ययसाधित नामे :-

अव्ययांचा वापर नामासारखा केल्यास त्याला अव्ययसाधित नामे म्हणतात.

उदा., त्यांच्या बोलण्यात परंतुचा वापर होतो. (अव्ययसाधित नाम)

इतर उदाहरणे :- आणि, वाह-वाह, छी-थू. इत्यादी.